# प्रेसनोट

जा.क्र. २०३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०१/०५/२०१७

## महाराष्ट्र दिन कार्यक्रम सोहळा

आज दि. ०१/०५/२०१७ रोजी पोलीस मुख्यालय भंडारा येथील कवायत मैदानावर १ मे महाराष्ट्र व कामगार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भंडारा जिल्हयाचे पालक मंत्री मा. श्री. डॉ. दिपक सावंत हे होते. कार्यक्रमाला आमदार मा. श्री. रामचंद्र अवसरे, जिल्हाधिकारी भंडारा मा. श्री. सुहास दिवसे, पोलीस अधीक्षक भंडारा मा. श्रीमती विनीता साहू, अप्पर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. जोगदंड, पोनि. धुसर स्थागुशा भंडारा, पोनि. श्री. चव्हाण, सपोनि. श्री. हत्तीमारे जिवीशा. भंडारा हे उपस्थित होते.

सर्वप्रथम पालकमंत्री भंडारा जिल्हा मा.ना. श्री. डॉ. दिपक सावंत यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाला मानवंदना देण्यात आली. तदनंतर मा. महोदयांनी परेडचे निरीक्षण केले. मा.महोदयांनी आपल्या भाषणात उपस्थित नागरिक,अधिकारी/कर्मचारी, शिक्षक व शाळेकरी मुलांना महाराष्ट्र दिन/कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या, शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विवीध योजना बाबत माहीती दिली. **हिंदुहृदयसम्राट** श्री.बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना सुरू केली आहे. त्याचप्रमाने महाराजस्व अभियानांतर्गत ७४ शांळामध्ये शिबीराचे आयोजन करून २४ हजार विदयार्थ्यांना विविध दाखल्याचे वाटप करण्यात आले आहे. महसुल विभागाचा हा उपक्रम अभिनंदनीय आहे. कुशल मन्युष्यबळाच्या निर्मीती साठी राज्यशासन **प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान** हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबवीत आहे. मा. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांच्या **एक कदम स्वच्छता की ओर** या आव्हानास प्रतीसाद देत महाराष्ट्राने **सप्तपदी स्वच्छतेची** या माध्यमातुन सात पावले टाकली आहेत. आरोग्य विभागाच्या वतीने जन आरोग्याच्या विविध योजना राबविण्यात येतात शिक्षण क्षेत्रात झपाटयाने क्रांती होत असुन तंत्रज्ञानाचा मोठया प्रमानात वापर होत आहे. केंद्र सरकारच्या साहाय्याने **प्रधानमंत्री आवास योजना** राबविली जात आहे. भंडारा जिल्हा तलावांचा जिल्हा म्हणुन प्रसिध्द असुन जिल्हयातील मुख्य पिक भात आहे. शासकीय योजनांचा लाभ सामान्य मानसाला घरपोच मिळावा या उद्देशाने जिल्हा प्रशासनाने विविध विभागाच्या योजना, दाखले व प्रमानपत्र एकाच ठिकाणी मिळावे यासाठी गावभेट कार्यक्रम संकल्पना राबविण्याचे ठरविले आहे. जेष्ठ नागरीक, महिला, विद्यार्थी—विद्यार्थीनी आणी अंपग यांना पोलीस ठाण्यात तक्रार करणे सोईचे व्हावे या दृष्टीकोणातुन भंडारा जिल्हा पोलीस दलातर्फे **मोबाईल पोलीस स्टेशन** ही योजना जानेवारी २०१७ पासुन सर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीत राबविण्यात येत आहे. आतापर्यत १७५ गावात पोलीस ठाणे आपल्या दारी ही संकल्पना यशस्वीरित्या राबविण्यात आली आहे. या योजनेत जनतेच्या तक्रारीची नोंद घेवुन निराकरण करण्यात येते. भंडाऱ्या जिल्हयात ही संकल्पना यशस्वी झाल्याचे पाहुन मार्च २०१७ पासुन मध्यप्रदेश, गुजरात, बडोदा व चंदीगड राज्यातील सरकारने **आपका थाना आपके गाव** ही योजना

राबवीने सुरू केले आहे. हा उपक्रम खरोखरच स्तुत्य व अनुकरणीय असुन इतर जिल्हयाने आदर्श घ्यावा असाच आहे. या साठी मी भंडारा पोलीस दलाचे अभिनंदन करतो.
तसेच **हरित महाराष्ट्र** संकल्पना प्रत्यक्षात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. नागरीकांनी वृक्ष लागवड व संगोपन करून यामध्ये सक्रीय सहभाग दयावा.

त्यानंतर परेडचे संचालन करण्यात आले, परेडमध्ये भंडारा जिल्हा पोलीस महिला व पुरूष पोलीस पथक, भंडारा जिल्हा महिला व पुरूष गृह रक्षक पथक, भंडारा जिल्हा दामिनी पथक, श्वान पथक, जन जागृती रथ व बॅड इ. पथकाचा समावेश होता. परेड कमांडर उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर श्री. साळी हे होते. तसेच दुय्यम परेड कमांडर श्री. मधुकर प्रधान राखीव पोलीस उपनिरीक्षक पो.मु. भंडारा हे होते.

यावेळी मा. पालकमंत्री महोदय यांच्या हस्ते प्रशंसनिय सेवेबद्दल, पोलीस अधिकारी/कर्मचारी १) पोउपनि श्री. राजु गोविंदराव कपाटे हे दि. २५/८/२०८३ पासुन पोलीस दलात कर्तव्यावर असुन उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय तुमसर येथे कर्तव्यावर आहेत. २) पोहवा. केशवराव तेजराम राहांगडाले हे दि.२०/१२/१९९१ पासुन पोलीस दलात कर्तव्यावर असुन सध्या पोलीस मुख्यालय भंडारा येथे कवायत निर्देशक पदावर आहेत. ३) पोहवा. रमाकांत बाबुलाल दिक्षीत हे दि. २२/०२/१९८८ पासुन पोलीस दलात कर्तव्यावर असुन सध्या पोलीस स्टेशन पवनी येथे कर्तव्यावर आहेत. ४) पोहवा. मोहन रामचंद्र निखारे हे दि. २०/१२/१९९१ पासुन पोलीस दलात कर्तव्यावर असुन सध्या वाचक शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय येथे कर्तव्यावर आहेत. ५) पोहवा. अशोक चंद्रशेखर लिंगायत हे दि. २२/०२/१९८८ पासुन पोलीस दलात कर्तव्यावर असुन सध्या नागरीहक्क संरक्षण विभाग भंडारा येथे कर्तव्यावर आहेत. ६) पोहवा. मुनेश्वर हगरूजी मेश्राम हे दि. २४/१२/१९९२ पासुन पोलीस दलात कर्तव्यावर असुन सध्या पोलीस मुख्यालय भंडारा येथे कवायत निर्देशक पदावर आहेत. वरिल नमुद अधिकारी कर्मचारी यांना प्रशंसनिय सेवेबद्दल मा. पोलीस महासंचालक यांचे कडुन प्रदान झालेले सन्मान चिन्ह / प्रशस्ती पत्र देवुन सन्मानित करण्यात आले.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

1-5-2017

सपोनि. हत्तीमारे सा.
जिवीशा कार्यालय भंडारा
दुरध्वनी.क्र.८६६८६९५६३५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.